ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# उच्च प्राथमिक स्तरावरील भाषा अध्यापनामध्ये सांघिक अध्यापनाची परिणामकारकता एक अभ्यास

**सौ. शोभा संग्राम पाटील**
*आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सातारा.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

नवोपक्रमातील शिक्षणामध्ये सांघिक अध्यापन ही एक महत्वाची पध्द्त आहे. एकविसाव्या शतकात तंत्रविज्ञानाने मोठी प्रगती केली आहे. शिक्षणक्षेत्रातही नवनवीन बदल होत आहेत गतिमान बदलांचा समाज व मानवी जीवनावर परिणाम होणे अपरिहार्य आहे. या बदलांचा स्वीकार केल्याशिवाय शिक्षणाला योग्य गती येणार नाही. चार भिंतीच्या आत चालणा—या अनेक पारंपारिक अध्यापन पध्द्तीवर शिक्षणक्षेत्रातील अनेक विचारवंतांनी आक्षेप घेतले आहेत. प्रस्तुत पारंपारिक पदधृतीमूळे विद्यार्थी निष्क्रिय बनतात. आकलन,तर्क, विचार इ. शक्तीचा विकास खुंटतो. अवधान फारकाळ टिकून राहत नाही. तर अध्ययन अध्यापन नाविन्यपूर्ण असणे ही काळाची गरज बनली आहे. भूतकाळातील घटनांचा अभ्यास व वर्तमानाशी तुलना करून भविष्याचा वेध घ्यायला शिकणारे शिक्षण देणे अपेक्षित आहे.

एका शिक्षकाने एका विषयाचे अध्यापन करणे ही प्राचीन पदधृती आहे. परंतु सद्य:स्थितीत अनेक अडचणीमुळे व मर्यादांमुळे शिक्षक त्याचा अध्यापनाचा दर्जा उच्च ठेवू शकत नाही. विविध पद्धती शिक्षक हाताळू शकत नाही. शैक्षणिक साधनांचा वापरही चांगला करू शकत नाही. म्हणजे एकाच विषयाचे अध्यापन करणारा शिक्षक हा कौशल्यपूर्ण नसतो. विविध शिक्षकांचा विचार केल्यास वेगवेगळया शिक्षकांजवळ वेगवेगळी कैशल्ये असतात. कोणाला विद्यार्थ्यांपुढे प्रभावीपणे व्याख्यान देता येते. तर कोणाला व्यक्तिगत अडचणी समजून त्यांना मार्गदर्शन करणेअधिक चांगले जमते. कोणाचा अवाज चांगला असतो. तर कोणाचे हस्ताक्षर सुंदर असते. कोणाचे सप्टीकरण कैशल्य अधिक परिणामकारक असते. तर कोणला विद्यार्थ्यांच्या चर्चेचे कुशलतेने संयोजन करता येते. तर एखादयाला व्याकरणासारखा विषयांश आत्मविश्वासाने शिकविता येते.

या सर्व गोष्टी लक्षात घेवून शिक्षकाला त्याच्या गुणवैशिष्टयाप्रमाणे अध्यापन करता येईल अशी व्यवस्था करून ज्यांना ज्या गोष्टीची आवड असेल त्या विषयाचे अध्यापन अधिक चांगल्या व प्रभावीपणे करता येईल यातून सांघिक अध्यापन पद्धतीचा उदय झाला.

परिणामकारक अध्ययन घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून एक आधुनिक अध्यापन पद्धती म्हणजे सांघिक अध्यापन होय.

**सांघिक अध्यापन अर्थ :—**

1. सांघिक अध्यापन म्हणजे अनेक शिक्षकांनी मिळून शिकविणे होय.
2. विशिष्टय विद्यार्थ्यांच्या गटाला एखदया विषयाचे वा घटकाचे दोन किंवा अधिक शिक्षकांच्या संघाने नियोजनपूर्वक केलेले अध्यापन आणि मूल्यमापन म्हणजे सांघिक अध्यापन होय.

**संशोधनाची उदिद्ष्टये :—**

१. इयत्ता ८ वी हिंदी सुलभभारती या पाठयपुस्तकातील सांघिक अध्यापनासाठी पाठ निवडणे.

२. इयत्ता ८ वी सुलभारती या पाठयपुस्तकातील पृथ्वी भौगोलिक घटकाचे सांघिक अध्यापनाने पाठ आराखडा तयार करणे.

३. इयत्ता ८ वी च्या वरील घटकासाठी पारंपारिक पद्धतीने अध्यापनासाठी पाठ आराखडा तयार करणे.

४. इयत्ता ८ वी च्या सुलभारती पाठयपुस्तकातील पृथ्वी या घटकासाठी पारंपारिक अध्यापन पद्धती आणि सांघिक अध्यापन पद्धती यांच्यातील परिणामकारकतेची तूलना करणे.

**संशोधन परिकल्पना :—**

इयत्ता ८ वी हिंदी सुलभारती पाठयपुस्तकातील पृथ्वी या भौगोलिक घटकांसाठी पारंपारिक अध्यापन पद्धतीपेक्षा सांघिक अध्यापन ही अधिक परिणामकारक ठरते.

**शून्य परिकल्पना :—**

इयत्ता ८ वी हिंदी सुलभारती पाठयपुस्तकातील पृथ्वी या भौगोलिक घटकांसाठी पारंपारिक पद्धतीने केलेल अध्यापन आणि सांघिक पद्धतीने केलेले अध्यापन यांच्यामुळे होणा—या विद्यार्थ्याच्या संपादनाच्या मध्यमानामध्ये फरक असणार नाही.

**संशोधनाची पद्धती :—**

संशोधनासाठी संशोधकाने प्रायोगिक पद्धतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनातील अभिकल्प :—**

संशोधनासाठी केवळ उत्तर परीक्षण समतुल्य नियंत्रित गट अभिकल्पाची निवड केली होती.

**संशोधनातील नमुना निवडः—**

संबधित संशोधनसाठी संशोधकाने असंभाव्यता पद्धतीमधील संप्रयोजन नमुना निवडीचा आधार घेतला आहे. संशोधनामध्ये ज्या ठिकाणी इयत्ता ८ वी चा वर्ग उपलब्ध होण्याची शक्यता होती त्या माध्यमिक शाळेची निवड सप्रयोजन पद्धतीने करण्याचे निश्चित केले व त्यानुसार सातारा तालुक्यातील इंग्लिश स्कूल वडूज या माध्यमिक शाळेची निवड केली. या शाळेतील इयत्ता ८ वी च्या वर्गातील एकूण ५० विद्यार्थ्यांमध्ये प्रत्येकी २५ विद्यार्थ्यांची

प्रायोगिक व नियंत्रीत गटासाठी निवड केली. प्रायोगिक व नियंत्रित गटामध्ये विद्यार्थ्यांची विभागणी करताना यादृच्छिक पद्धती वापरली.

**संशोधनाची साधने :–**

प्रायोगिक संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी निरीक्षण, मुलाखत, समाजमिती संपादन प्रशनावली मानसशास्त्रीय चाचणी इत्यादी साधनांचा वापर केला जातो.

प्रस्तूत संशोधनात संशोधकाने माहिती संकलीन करण्यासाठी संपादन चाचणी या साधनांचा वापर केला.

**उद्दिष्टानुसार कार्यवाही :–**

**उदिद्ष्ट क्रमांक ०१–** इयत्ता ८ वी च्या हिंदी विषयाच्या पाठयपुस्तकातील सांघिक अध्यापनासाठी योग्य पाठ निवडणे.

या उदिद्ष्टासाठी ज्या पाठात सांघिक अध्यापनास अधिक वाव आहे अशा पाठांची निवड केली. यामध्ये ८ वी च्या हिंदी पाठयपुस्तकातील पृथ्वी या भौगोलिक पाठाची निवड केली.

**उदिद्ष्ट क्रमांक ०२–**इयत्ता ८ वी च्या हिंदी विषयाच्या पाठयपुस्तकातील भौगोलिक घटक पृथ्वी या घटकाच्या सांघिक अध्यापनासाठी पाठ आराखडा तयार करणे.

पृथ्वी या घटकाच्या सांघिक अध्यापनाचा पाठ आराखडा तयार करण्यासाठी पुढील सांघिक अध्यापनाच्या पाय–याचा वापर करण्यात आला.

**१.प्रस्तवना :–**

शिक्षक विद्यार्थ्यांना पृथ्वी हा घटक शिकविण्यासाठी प्रथम प्रस्तावना करतात.

**२. हेतूकथन :–**

प्रस्तावनाझाल्या नंतर कोणता घटक शिकवायचा आहे या बदद्ल शिक्षक हेतूकथन करतात.

**३. सांघिक अध्यापनाची माहिती देणे :–**

सदरचा पाठ सांघिक अध्यापनाने शिकायचा आहे असे सांगतांत सांघिक अध्यापनाची माहिती देतात.

**४. प्रत्येक शिक्षकाची जबाबदारी व कर्तव्ये निश्चित करणे :–**

सदरचा पाठ सांघिक अध्यापन पद्धतीने घेण्याचा असल्याने शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांनी आपआपल्या क्षमता व कौशल्य याची जाणीव ठेवून जबाबदा–या व कर्तव्ये यासाठी विविध क्षेत्रे निवडली होती. अध्यापन कौशल्यापैकी फलक लेखन, स्पष्टीकरण दृक–श्राव्य साधनांचा वापर वर्ग पर्यवेक्षण अशा चार भूमिकेतून संघातिल शिक्षक प्रशिक्षकांनी आपल्या जबाबदा–या व कर्तव्य निश्चित करून अध्यापन केले.

**सांघिक अध्यापनासाठी सुचना :–**

शिक्षक अध्यापनाला सुरवात करण्याअगोदर विद्यार्थ्यांना सामूहिक सूचना देतात. त्या पुढील प्रमाणे.

१. फलकावरील लेखन वहीत नोंद करून घेण्यास सांगतात.

२. स्पष्टीकरणामध्ये काही शंका असल्यास प्रश्न विचारण्यास सांगतात.

३. शैक्षणिक साधन दिग्दर्शनात विद्यार्थ्यांने सहभाग घेण्यास व निरीक्षण करण्यास सांगतात.
४. निरीक्षणाच्या वहीत नोंद करण्यास सांगतात.
५. सांघिक अध्यापनासाठी किती वेळ आहे ते समजावून सांगतात.

**सांघिक अध्यापनाला सुरवात :—**

प्रत्येक्ष सांघिक अध्यापनाचे सादरीकरण होते. विद्यार्थी निरीक्षण कृती व चर्चा करून वहिमध्ये नोंदी करतो. एका शिक्षक प्रशिक्षकाकडून विद्यार्थ्यांचे वर्ग पर्यवेक्षण केले जाते.

वरील पाय—यानुसार तसेच शिक्षक प्रशिक्षकाच्या जबाबदा—या व कर्तव्या नुसार प्रायोगिक गटासाठी सांघिक अध्यापनाचा पाठ आराखडा तयार करण्यात आला.

**उदिद्ष्ट कमांक ०३**—इयत्ता ८ वी च्या पृथ्वी या भौगोलिक घटकासाठी पारंपारिक पध्दतीने अध्यापनासाठी पाठ आराखडा तयार करणे.

पृथ्वी हा पाठ पारंपारिक पध्दतीने अध्यापन करण्यासाठी हर्बाटच्या पंचपदीचा वापर करून पाठ आराखडा तयार करण्यात आला.

**उदिद्ष्ट कमांक ०४** —इयत्ता ८ वी च्या सुलभारती पाठयपुस्तकातील पृथ्वी या भौगोलिक घटकासाठी पारंपारिक अध्यापन पध्दती आणि सांघिक अध्यापन पध्दती यांच्यातील परिणामकारकतेची तुलना करणे.

सांघिक अध्यापन पध्दती व पारंपारिक पध्दतीने पाठ आराखडा तयार करून दोन्ही गटावर अध्यापन केले. यामध्ये प्रायोगिक गटात २५ विद्यार्थ्यांचा तर नियंत्रित गटात २५ विद्यार्थ्यांचा समावेश होता. नियंत्रित गटाला पारंपारिक पध्दतीने अध्यापन केले. तर प्रायोगिक गटाला सांघिक पध्दतीने अध्यापन केले. त्यानंतर दोन्ही गटात उत्तर चाचणी संपादन चाचणी देवून त्या गुणावरून मध्यमान, प्रमाण विचलन काढण्यात आले. तर प्रायोगिक गटाचे मध्यमान हे नियंत्रीत गटाच्या मध्यमानापेक्षा जास्त आले.

**निष्कर्ष :—**

इयत्ता ८ वी च्या  हिंदी सुलभभारती विषयातील पृथ्वी या भौगोलिक घटकासाठी सांघिक अध्यापन पध्दती परिणामकारक ठरली.

**अनुमान—**

इयत्ता ८ वी च्या हिंदी सुलभभारती विषयातील पृथ्वी या भौगोलिक घटकासाठी सांघिक अध्यापन पध्दती परिणामकारक ठरते.

**समारोप—**

भौगोलिक घटकासाठी सांघिक अध्यापन केले असता विद्यार्थ्यांच्या संपादनामध्ये परिणाम दिसून येतो. त्यासाठी सांघिक अध्यापन पध्दती ही एक नावीन्यपुर्ण आणि आव्हानात्मक पद्धती आहे. या पद्धतीचा वापर आपण आपल्या अध्यापनामध्ये केला पाहिजे.

**संदर्भ सुची :—**

*मुळे रा.श.व उमाठे वि.तु. (१९८७), शैक्षणिक संशोधनाचे मुलतत्वे,नागपूर महाराष्ट विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ*

*सप्रे निलीमा, पाटील प्रिती, (२००९), शिक्षणातील विचार प्रवाह कोल्हापूर फडके प्रकाशन*

*भालेराव सुभाष (२०११), उद्याच्या शिक्षकांसाठी मराठी शिक्षण, नाशिक इनसाईट पब्लिकेशन.*